# कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना

टोल फ्री क्रमांक - 1064

कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252

:: प्रेस नोट :: दिनांक :- 08.04.2021.

**पोलीस ठाणे गोंदी जि. जालना येथील पोलीस हवालदार श्री. भास्कर रामहरी आहेर यांना 15,000/- रुपयांची लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झालेवरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना कडुन गुन्हा दाखल.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | लोकसेवक श्री. भास्कर रामहरी आहेर, पोहेकॉ/723 नेमणुक पोलीस ठाणे गोंदी जि जालना |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक 11.02.2021 रोजी लाच मागणी |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 15,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, तक्रारदार यांचेवर पोलीस गोंदी जि. जालना येथे गुरनं 32/2021 कलम 379 भादंवि प्रमाणे गुन्हा वाळु वाहतुकीबाबतचा दाखल असुन त्यांना सदर गुन्हयात मदत करुन त्यांचा मोबाइल परत करण्यासाठी तसेच त्यांचे जप्त असलेले ट्रॅक्टर सोडण्याबाबत चांगला से अहवाल मा. न्यायालयात सादर करण्यासाठी आलोसे श्री. भास्कर रामहरी आहेर, पोहेकॉ/723 यांनी तक्रारदार यांचेकडे 15,000/- रुपयांची लाचेची मागणी केली होती. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दिनांक 11.02.2021 रोजी लाचेची पडताळणी केली असता, आलोसे श्री. भास्कर रामहरी आहेर, पोहेकॉ/723 यांनी तक्रारदार यांचेवर पोलीस गोंदी जि. जालना येथे गुरनं 32/2021 कलम 379 भादंवि प्रमाणे गुन्हा वाळु वाहतुकीबाबतचा दाखल असुन त्यांना सदर गुन्हयात मदत करुन त्यांचा मोबाईल परत करण्यासाठी तसेच त्यांचे जप्त असलेले ट्रॅक्टर सोडण्याबाबत चांगला से अहवाल मा. न्यायालयात सादर करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे 15,000/- रुपयांची लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाले होते. आलोसे श्री. भास्कर रामहरी आहेर, पोहेकॉ/723 यांनी तक्रारदार यांचेकडे 15,000/- रुपयांची लाच मागणी केल्याचे निष्पण्ण झाले आहे. म्हणुन लोकसेवक श्री. भास्कर रामहरी आहेर, पोहेकॉ/723 नेमणुक पोलीस ठाणे गोंदी जि जालना (वर्ग - 3) यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच अॅन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.

पोलीस उप अधिक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना